## फिनोलेक्स अकॅडमी ऑफ मॅनेजमेंन्ट ॲन्ड टेक्नोलॉजीमध्ये संस्थापक अध्यक्ष श्री. प्रल्हाद पी.छाब्रिया, यांच्या पुतळयाचा अनावरण समारंभ आणि वार्षिक समारंभ युटोपिया २०१७ व ब्रेनवेव्हज् २०१७ स्नेहसंमेलनाचा उद्‌घाटन समारंभ संपन्न

''माननीय संस्थापक अध्यक्ष श्री. प्रल्हाद पी.छाब्रिया यांचे जीवन म्हणजे आपणा सर्वांसाठी एक मोठी शिकवणच होय'' असे प्रतिपादन डॉ. अनिल सहस्त्रबुध्दे,चेअरमन, ऑल इंडिया कौन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेशन (एआयसीटीई),नवी दिल्ली यांनी केले.येथील फिनोलेक्स ॲकॅडमीच्या संस्थापक अध्यक्ष श्री. प्रल्हाद पी.छाब्रिया, यांच्या पुतळयाचा अनावरण समारंभ आणि वार्षिक समारंभ युटोपिया २०१७ व ब्रेनवेव्हज् २०१७ स्नेहसंमेलन समारंभाच्या उद्‌घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर सन्माननिय विशेष अतिथी श्री.प्रदिप भार्गव, संचालक, कमिन्स इंडिया लि., श्रीमती. अरुणा कटारा, अध्यक्ष, होप फौंडेशन, संस्थेचे प्राचार्य डॉ.कौशल प्रसाद, विद्यार्थी प्रतिनिधी सुमित आंब्रे व जयश्री शिवलकर, ब्रेनवेव्हचे विद्यार्थी प्रतिनिधी अपराजित कुलकर्णी इ. उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु.विशाल पाटिल व कु.सानिया मुर्तुझा यांनी केले. प्राचार्य डॉ.कौशल प्रसाद यांनी मान्यवरांचे स्वागत व परिचय करून दिला. विद्यार्थी प्रतिनिधीनी कॉलेजमधील विविध स्तरावरील घटनांचा मागोवा घेतला व विशेष प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांबद्‌दल माहिती दिली.

डॉ. अनिल सहस्त्रबुध्दे आपल्या भाषणात पुढे म्हणाले,''माननीय छाब्रिया यांचा उद्योग प्रवास विचारात घेता आजचा फाऊंडर्स डे हा उद्योजकता दिवस म्हणूनही साजरा केला जाऊ शकतो. फिनोलेक्स ॲकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी मुंबईसारख्या मोठया शहरातील विद्यार्थ्यांना टक्कर देवून जे घवघवीत यश त्यांच्या शिक्षणात मिळवले आहे ते प्रशंसनीय आहे. यामधून शिक्षकांची शिक्षण विषयक आवड व विद्यार्थ्यांची शिकण्याशी असलेली बांधिलकी लक्षात येते.

ग्रामिण भागामध्ये लोकांना शहराप्रमाणे सोयीसुविधा उपलब्ध नसतात यामुळेच ग्रामीण लोकांना शिक्षण, आरोग्यसुविधा तसेच रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे महत्वाचे असते ही दृष्टी मा. चेअरमन छाब्रिया साहेब यांच्या ठायी होती हे त्यांच्या कार्यातून प्रकर्षाने प्रत्ययास येते. प्रामाणिकपणाच्या पायावर कठोर परिश्रमाच्या सहाय्याने मा. छाब्रिया साहेब यांनी केलेली फिनोलेक्स उद्योग साम्राज्याची निर्मिती हा फार मोठा आदर्श होय. विद्यार्थ्यांमधील विविध कौशल्यांचा विकास होण्याकरिता उद्योग जगतातील लोकांचा विद्यार्थ्यांशी शिक्षक म्हणून संपर्क येणे महत्वाचे आहे व यादृष्टीने एआयसीटीईने पाऊले उचलली आहेत. शिक्षणामध्ये महत्वपूर्ण बदल आणण्यासाठी येवू घातलेल्या निरनिराळया योजना जसे की, ॲडजंक फॅकल्टी स्किम, उन्नत भारत अभियान, ट्रेनिंग ट्रेनी टिचर स्किम, स्वयंम, स्टार्टअप पॉलिसी आदी योजनांची सविस्तर माहितीही त्यांनी दिली.भारतातील विद्यार्थी शिक्षणासाठी परदेशात जाणे ही देखील एक मोठी समस्या आहे. देशातील शिक्षणामध्ये अधिकाधिक उत्कृष्ठता आणून या समस्येवर मात केली जाऊ शकते. तसेच इतर देशातील विद्यार्थ्यांना आपल्या देशात शिक्षणासाठी आकृष्ट केले जाऊ शकते '' असे ते म्हणाले.

विशेष अतिथी, श्री.प्रदिप भार्गव यांनी आपल्या भाषणात ''जीवनात ज्या प्रमुख घटकांचा अंतर्भाव आवश्यक आहे त्यांचे महत्व विषद केले. हे घटक म्हणजे शिक्षण, संस्कार, स्थैर्य, सन्मान आणि संपत्ती.शिक्षणामध्ये आपण शिकणे, शिकावयास हवे. शिक्षणाबरोबर संस्कार हे अत्यंत महत्वाचे आहेत. जग सदैव बदलत आहे व तसेच ते बदलत राहणार. तंत्रज्ञानाचा कितीही विकास झाला तरी देखील मुळ पाया बदलत नाही हे प्रत्येकाने लक्षात घेतले पाहिजे. जीवन जगताना आपणास सदैव जबाबदारीची जाणीव असणे आवश्यक आहे असे जीवन सन्मानास पात्र असते. या बदलत्या जगामध्ये व्यक्तीला एकाच वेळी अनेक जबाबदा-या पार पाडाव्या लागतात. त्यामध्ये संतुलन राखणे महत्वाचे आहे. सर्वात शेवटचा घटक म्हणजे संपत्ती होय. परंतू शिक्षण ते संपत्ती हा प्रवास या दोहोमधील चार घटक वगळून होता उपयोगाचा नाही. आपण कोणत्याही विद्याशाखेचे शिक्षण घेतले असले तरी सामाजिक दृष्टीकोनातून नाविन्यपूर्ण कल्पनांचा वेध घेता येणे तसेच नवनिर्माण क्षम बनणे महत्वाचे आहे. प्रथम स्थैर्य मिळवू व नंतर सेवा करु असे कधीच होत नाही म्हणून सुरूवातीपासूनच सेवा या मुल्याचा जीवनामध्ये अंतर्भाव करणे अत्यंत आवश्यक आहे '' असे त्यांनी सांगितले.

तर श्रीमती. अरुणा कटारा यांनी आपल्या भाषणाची सुरुवात गुरु ब्रम्हा गुरु विष्णु या प्रार्थनेने करून संस्थापक अध्यक्ष श्री. प्रल्हाद पी.छाब्रिया यांना आदरांजली वाहिली. फाऊंडर्स डे हा दिवस चेअरमनांच्या विचारांप्रती समर्पित होऊन साजरा करण्याचा दिवस आहे असे त्या म्हणाल्या. त्यांनी आपल्या भाषणात संस्थापक अध्यक्ष श्री. प्रल्हाद पी.छाब्रिया यांचा जीवनपट थोडक्यात उलगडून दाखविला. भारताच्या खेडयातील माणूस उच्च शिक्षणाचा अनुकूल परिस्थितीचा अभाव असूनसुध्दा आपले जीवन स्वाभीमानाने व गर्वाने जगतो हे त्यांच्या लक्षात आले होते आणि म्हणूनच अशा ग्रामिण भागातील माणसांना परवडेल अशा शिक्षणाची सोय करण्याचे त्यांनी ठरवले व प्रत्यक्षात आणले. रत्नागिरी येथील फिनोलेक्सचा भव्य प्रकल्प व फिनोलेक्स ॲकॅडमी ही याची फलश्रुती होय. माननीय चेअरमन यांचे जीवन ज्या मुल्यांवर आधारित होते त्यांचा वारसा सर्वांनी पुढे चालवावा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.''

यावेळी अकॅडमीमधील गुणवंत विद्यार्थ्याना चेअरमन प्राईझ व स्व.श्रीमती मोहिनी छाब्रिया ॲवॉर्ड प्रत्येकी रू दहा हजारची रोख पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. तसेच गुणवंत गरजू विद्यार्थ्यांना होप फाऊंडेशन शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. तसेच आविष्कार व माहेर या संस्थांना सामाजिक जाणीवेतून मदत करण्यात आली.

प्रथम वर्ष इंजिनिअरींग मध्ये सर्वप्रथम येण्यासाठी व एकाच प्रयत्नात परिक्षा पास होण्यासाठी असलेले चेअरमन प्राईझ कु.ऋषीकेश दळे यांने पटकाविले. इंजिनिअरींग अभ्यासक्रमात अकॅडमीमध्ये प्रत्येक शाखेतून प्रथम येण्यासाठी दिला जाणारा स्व.श्रीमती मोहिनी छाब्रिया ॲवॉर्ड इलेक्ट्रॉनिक्स शाखेतून कु.र्हषद पवार, इलेक्ट्रीकल शाखेतून कु.मानसी सुर्वे, मेकॅनिकल शाखेतून कु.निखिल नाईक, इन्फॉरमेशन टेक्नोलॉजी शाखेतून कु.सनोबर लांबे, केमिकल शाखेतून कु. स्वप्नजा देसाई, इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन शाखेतून कु.स्नेहल सावंत व एमसीए शाखेतून कु.मंगेश सावंत यांना प्रदान करण्यात आला. तसेच कु. शुभम डेरे, कु. स्वरुपा बागडे, कु.संकेत प्रभु, कु. हर्षदा गावडे या विद्यार्थ्यांना होप फाऊंडेशन शिष्यवृत्ती देऊन गौरवण्यात आले.

त्याचबरोबर, श्रीमती. अरुणा कटारा, अध्यक्ष, होप फौंडेशन यांच्यावतीने खेळातील विशेष प्राविण्याबद्दल मुली व मुलांमधून सर्वोत्तम क्रिडापटू पारितोषिक दिले जाते. २०१६-१७ वर्षातील सर्वोत्तम क्रिडापटू म्हणून कु. सुमित प्रल्हाद खाडे व कु.सियोना आय डिसोझा यांना गौरवण्यात आले. सर्वोत्तम विद्यार्थ्याचे पारितोषिक कु.सुमित प्रल्हाद खाडे या विद्यार्थ्याने पटकाविले.

यावेळी फिनोलेक्स ॲकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी संस्थेमधे स्वतः तयार केलेली रेसिंग व्हेइकल्सची सर्व मान्यवरांनी पहाणी करून कौतुक केले. टिम २५ नाइटमेअर्स यांनी सेव्हन मोटर्स स्टुडंट ग्रॅन्ड प्रीक्स २०१६-१७, विशाखापट्टणम् येथे संपूर्ण भारतामधे दुसरा क्रमांक पटकवला. तसेच टिम रेडलाइन रेसींगने इंडियन कार्ट रेसिंग चॅम्पिअनशीप स्पर्धेत ट्रॅफिक पार्क पुणे येथे संपूर्ण भारतामधे सातवा क्रमांक पटकवला.

ब्रेनवेव्हज अंतर्गत कलाकृती या कलादालनाचे उद्घाटन डॉ. अनिल सहस्त्रबुध्दे यांनी केले. या कलादालनात विद्यार्थ्यांनी अतिशय कुशलतेने घडवलेलया पॉट पेंटिंग, रांगोळी, चित्रकृती, फोटो गॅलरी आदी उपक्रमाबद्दल मान्यवरांनी समाधान व्यक्त केले. डॉ मिलिंद किरकिरे यांनी यंत्र अभियांत्रिकी शाखेत मुंबई विद्यापीठातून प्राप्त केलेलया पीएचडी साठी त्यांना गौरवण्यात आले. कु संजय स्वामी याने महाराष्ट्र गोवा सेक्शन मधील सर्वोत्कृष्ट विद्यार्थी गौरव पुरस्कार आयएसटीई कडून मिळवला त्याबद्दल त्याला गौरवण्यात आले.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डिन ॲकॅडेमीक्स डॉ संजय कुलकर्णी यांनी केले. यावेळी अकॅडमीचे विद्यार्थी, शिक्षकवृंद, पालक, परिसरातील मान्यवर व इतर श्रोतृवर्ग मोठया संख्येने उपस्थित होता. दिनांक ०९, १० व ११ मार्च २०१७ असे तीन दिवस सदर वार्षिक संमेलनाचा सर्व विद्यार्थी, पालकवर्ग व आमंत्रितांनी आस्वाद घ्यावा असे आवाहन करण्यात आले.